## मिशन नॅट

navneet.com
Page No. :
Date : / /

जगातील अनेक देशात प्राचीनकाळापासून हजारो युद्ध झाली. अनेक युद्धांचा इतिहास हे सांगतो की ज्या सैन्याकडे अधीक मारक शक्ती असलेली शस्त्रे ते सैन्य युद्ध जिंकते पण आधुनीक शस्त्रे असुनही युद्धात पराभव झाल्याची असंख्य उदाहरणे आहेत. आपले दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्याने बलाढ्य मुस्लीम सैन्याचा पराभव केल्याचे आपणास महित आहे. आधुनीक इतिहासात भारताने पाकिस्तानचा १९६५, १९७१ आणि १९९९मध्ये पराभव केला, त्यावेळी पाकिस्तानी सैन्याकडे भारतीय सैन्याकडे जी विमाने आणि रणगाडे होते त्याच्यापेक्षा आधुनिक लढाऊ विमाने आणि रणगाडे होते. पण आधुनिक शस्त्रे असली तरी ते योग्य प्रकारे वापरता आली पाहिजे, तसेच वापरणारा सैनिक निधड्या छातीचा असावा लागतो. बांगलादेशाचे युद्ध ३ डिसेंबर १९७१ या दिवशी सुरु झाले, पण त्यापूर्वी आधीच पाकिस्तानी सैन्याने आपल्या कुरापती काढायला सुरुवात केली होती भारताकडे छोट्या आकाराची नॅट विमाने होती आणि पाकिस्तानकडे मात्र मोठी आणि आधुनिक सेबरजेट लढाऊ विमाने होती.

२२ नोव्हेंबर १९७१ या दिवशी पाकिस्तानच्या सेबरजेट विमानांनी भारतीय भुमीत अतिक्रमण केले, पण आपल्या चिमुकल्या नॅट विमानांनी त्यांची चार सेबरजेट विमाने पाडली. तो प्रसंग पुढील प्रमाणे आहे —

२२ नोव्हेंबरला सकाळी ८वाजून ८मिनिटे झाली

होती, आणि आपल्या रडारवर चार सेबर जेट भारतातील म्हणजे बंगालच्या सीमेवरील बॉयरा या आपल्या ठाण्यावर हल्ला करण्यासाठी निघाली आहेत असे दिसले. आपली चार नॅट विमाने उड्डाणाच्या तयारीत आहेत असे दिसल्यावर सेबर जेट माघारी फिरली. ही भारताला दिलेली हूल होती, कारण दुपारी दोन वाजून ४८ मिनिटाने ती विमाने पुन्हा भारतीय हद्दीत आली, पण आपल्या नॅट विमानांनी तत्काळ उड्डाण केले. सेबर जेट भारताच्या हद्दीत येताच नॅट विमानांनी हल्ला केला. आकले वैमानिक फ्लाईट लेफ्टनंट गणपती आणि फ्ला. ले. लाझारुस यांनी दोन विमाने पाडली आणखी दोन सेबर जेट फ्लाईट लेफ्टनंट मासेई यांनी उरलेली दोन विमाने पाडली. पाकिस्तानचे दोन वैमानीक हवाई छत्रीच्या सहाय्याने खाली उतरले पण त्यांना आपल्या सैनिकांनी जिवंत पकडले. अशा रितीने नॅट विमानांनी हे सिद्ध केले की ही विमाने अजूनही किती उपयुक्त आहेत.

डॉ. अरुण जोशी
संपर्क - ९८६९२६७५२०



